## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/१०/२०१८
## दि.१२/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३०४/१८,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | योगश चाथे,वय २४ वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | बालाजी रंगनाथ चाथे,वय ४६ वर्षे,रा.फ्लॅट नं.१८, बिल्डींग नं.२,सरस्वती क्रपा सोसायटी ताडीवाला रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/१०/२०१८ रोजी दुपारी ०१/०० वा.चे सुमारास .फ्लॅट नं.१८, बिल्डींग नं.२,सरस्वती क्रपा सोसायटी ताडीवाला रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम बालाजी चाथे हे फिर्यादी यांचे वडिल असुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांचे वडीलांना फिर्यादी व त्यांची आई दारुपिण्यास विरेध करतात तसेच आईने दारु पिवु नका असे म्हणाल्याने फिर्यादी यांच्या वडिलांनी त्यांचे कंबरेला लावलेले रिव्हॉल्वर फिर्यादी यांचे आईवर रोखुन, रिव्हॉल्वर मधुन गोळी झडून, फिर्यादी यांचे आईस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.जे.घाग ९९२१५१९९१८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २९९/१८,भादविक ४२०,४६५,४६८,४७०,४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय ५७ वर्षे,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | एक इसम, व एक महिला, दोघे रा. फ्लॅट नं. ६०४, बिल्डींग ए १, ऑक्सफोर्ड व्हिलेज क्लासिक, केदारीनगर, वानवडी, पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. ३१/०८/२०१६ रोजी सुदर्शन मल्टीकॉम सर्व्हीसेस प्रा. लि. २२,अ,ब, कसबा पेठ, फडके हौद चौक, गणेश रोड, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम, महिला हे सुदर्शन मल्टीकॉम सर्व्हीसेस प्रा.लि. २२, अ,ब, कसबा पेठ, फडके हौद चौक, गणेश रोड, पुणे या कंपनीचे संचालक आहेत.दि. ३१/०८/२०१६ रोजी नमुद इसम व महिला यांनी आपआपसात संगणमत करुन, मॅग्मा फिनकॉप फायनांन्स प्रा.लि. या खाजगी कंपनीतुन रु. २० लाख सुदर्शन मल्टीकॉम सर्व्हीसेस प्रा. लि. २२, अ,ब, कसबा पेठ, फडके हौद चौक, गणेश रोड, पुणे या कंपनीच्या नावाने कर्ज घेतले. सदर कर्ज घेताना त्यांनी फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी यांच्या खोट्या सह्या व खोटे शेअर सटीफिकेट, खोटे ठराव तयार करुन, सदरची खोटे व बनावट दस्तऐवज खरे आहेत म्हणुन वापरुन, ते मॅग्मा फिनकॉप फायनांन्स प्रा. लि. या कंपनीत देवुन, फिर्यादी यांचा विश्वासघात करुन,फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. किशोर नावंदे ९९२२०३१००० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७४२/१८,भादविक ४२०,३४ सह माहिति तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६६ (सी), ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ३३ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | चार मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/१२/२०१७ रोजी सकाळी १०/३० वा.चे सुमारास फ्लॅट नं.६,बिल्डींग नं.३५,नॉर्थ विंग सेक्टर ३ व ४,प्रतिकनगर,येरवडा,पुणे. |

| | |
|---|---|
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी यातील फिर्यादी या त्यांचे राहते घरी असताना,फिर्यादी यांचे मोबाईल फोनवर फोन करुन, अज्ञात मोबाईल धारकांनी फिर्यादी यांना एटीएम कार्ड बंद होण्याचे कारण सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, फिर्यादी यांनी त्यांच्या बँकेची गोपनीय माहिती त्यास सांगितली असता,फिर्यादी यांचे अकाऊंटमधुन एकुण १ लाख २४ हजार ८७५/- रुपये रक्कम ओलाकॅब, एमपैसा, अफेक्समार्ट याव्दारे नमुद इसमांनी विड्रॉ करुन, ऑनलाईन माध्यमाव्दारे फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) किरण बालवडकर ९४२१२६२०७४ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४१९/१८,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ६७ वर्षे,रा.डेक्कन जिमखाना, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/१०/२०१८ रोजी ०१/०० वा.चे सुमारास स्वारगेट एस टी बस लगत असलेल्या कात्रज पी.एम.पी .एल.बस स्टॉपवर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हया सारसबाग (स्वारगेट) ते कल्याण या बसमध्ये पायरीवर उभेराहुन प्रवास करीत असताना,बस सुरु होताच अज्ञात इसमांनी फिर्यादी यांचे जवळील सोन्याचे दागिने एकुण १ लाख २० हजार रु. किं.चे कशाच्यातरी सहाय्याने कट करुन चोरुन नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कदम ९८२३६२४५८५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**